क्र.साप्रवि/रवका/न.क्र.८८७/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १८४ दिनांक १४ / १० / २००८

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ अंतर्गत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडे प्राप्त होणारे सर्व अपीले विहित मुदतीत निकालात काढणेबाबत.

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.१९ दिनांक १८.०२.२००५
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.२८ दिनांक २७.०३.२००६

.....

केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील तरतुदींची महावितरण कंपनीमध्ये काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता उपरोक्त संदर्भिय प्रशासकीय परिपत्रकान्वये यापूर्वीच सूचना जारी करण्यात आल्या आहेत. तथापि, प्रथम अपिलीय अधिकारी या अधिनियमान्वये त्यांच्यावर सोपविलेली जबादारी योग्य रीतीने पार पाडत नाहीत असे निदर्शनास आले आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत माहिती अधिकाऱ्यांनी पुरविलेल्या माहितीच्या संदर्भात अर्जदार असमाधानी असल्यास, तो प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल करु शकतो. अशा प्रसंगी प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने अर्जदारांची अपीले निकाली काढण्याचे आदेश पारित करण्यापूर्वी संबंधित अर्जादारास सुनावणीची संधी देणे आवश्यक आहे.

३. या अनुषंगाने मा.राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेला द्वितीय अपिलावरील निर्णय तथा या संबधी महाराष्ट्र शासनाचा निर्णय क्र.केंमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ.) दिनांक ०६.११.२००७ ची प्रत सर्व कार्यालय प्रमुख व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

४. तेव्हा सर्व कार्यालय प्रमुख यांनी शासन निर्णय क्र.केंमाअ-२००७/११८२/ प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ.) दिनांक ०६.११.२००७ यातील सूचना त्यांच्या अखत्यारीतील सर्व अपिलीय अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणाव्यात. जेणे करून त्यांच्याकडील प्रथम अपीलावर अर्जदारास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन अपील विहित मुदतीत निकाली काढतील. तसेच सदरील सूचनांचे सर्व अपिलीय अधिकारी काटेकोरपणे पालन करतील याची दक्षता घ्यावी.

४. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(सु. य. पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति
विभागीय व त्यावरील स्तराच्या सर्व कार्यालयांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Adm.Cir.F.N.887-RTI*
*13/10/08*

# BEFORE THE STATE INFORMATION COMMISSION
# MAHARASHTRA KONKAN REGION

**Appeal under Section 19(3) of RTI Act 2005.**

**Appeal No./ KR-1524/08**

Shri Manohar Nanaji Nikam. ..... Appellant
Mal Plaza Co.operative Hsg., Society,
B-202, Subhash Nagar, Karjat Road,
Badalapur (E). Taluka ; Ambernath,
District : Thane. : 421 503.

V/s

**Public Information Officer** ... .. Respondent
Executive Engineer, (Commerce).
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.,
Prakashgad. 5th floor. Anant Kanekar Marg,
Bandra (E). Mumbai : 400 051.

**The Appellate Authority,**
Superintending Engineer, (Commerce-1),
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.,
Prakashgad. 5th floor. Anant Kanekar Marg,
Bandra (E), Mumbai : 400 051.

**Facts**

Please see Appeal application annexed.

**Decision**

Appellant is not present. First Appellate Authority Shri N.G. Naru. Superintending Engineer, and Public Information Officer Shri J.K. Patil, Executive Engineer are present.

The case has been examined on merits. First Appellate Authority says that yesterday all the information has been given.

There is one great flaw in this case that the First Appellate Authority has not given a hearing and a reasoned decision. He has been given a copy of Government circular of 6.11.2007, which makes hearing mandatory.

I am, therefore, remanding this appeal to the First Appellate Authority for giving a hearing to the appellant and a reasoned decision about the supply of information.

A compliance report should be sent to me within 45 days. The First Appellate Authority should also circulate this decision along with Government circular of 6.11.2007 to all First Appellate Authority's in Mahavitaran..

(Navin Kumar)
State Information Commissioner
Konkan Region

Konkan Bhavan,
Belapur. Navi Mumbai.
Date:-4th October, 2008.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील
कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी
यांनी त्यांचेकडे प्राप्त होणारे सर्व अपीले
विहित मुदतीत निकालात काढणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्र. कॆंमाअ-२००७/११८२/प्र.क्र. ६५/०७/६ (मा.अ.)
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ६ नोव्हेंबर, २००७

परिपत्रक :-

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अधिकाऱ्यांनी एक महिन्यात अर्जदारास माहिती पुरविणे आवश्यक आहे. पुरविलेल्या माहिती संदर्भात अर्जदार असमाधानी असल्यास, तो प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील दाखल करु शकतो व त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने सर्वसाधारण परिस्थितीत ३० दिवसात व अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवसात निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयामुळे अर्जदाराचे समाधान झाले नसल्यास, कलम १९(३) अन्वये तो मुख्य आयुक्त, राज्य माहिती आयोग यांचेकडे द्वितीय अपील दाखल करु शकतो.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, जवळ जवळ ४५ टक्के प्रकरणांवर प्रथम अपिलीय अधिकारी अर्जदारांची अपीले निकाली काढताना आदेश पारीत करीत नाहीत किंवा आदेश पारीत केले असल्यास ते पारीत करण्यापूर्वी संबंधित अर्जदारास सुनावणीची संधी देत नाहीत. अशाप्रकारे प्रथम अपिलीय अधिकारी या अधिनियमान्वये त्यांचेवर सोपविण्यात आलेली जबाबदारी योग्यरितीने पार पाडीत नाहीत. पर्यायाने अर्जदाराच्या हालअपेष्टांत भर पडत असून त्यांना यथोचित न्याय मिळत नाही. त्याचबरोबर त्यांच्या या वर्तणूकीमुळे राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणाऱ्या द्वितीय अपीलाच्या अनुषंगाने त्यांच्याही कामकाजात अनावश्यकपणे वाढ होत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत राज्य शासनाकडील विविध मंत्रालयीन विभागांकडे व त्यांचे अधिपत्याखालील क्षेत्रिय प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दाखल होणारी प्रथम अपिले ही समन्यायीक (quasi-judicial) स्वरुपाची असून प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी या अनुषंगाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे पालन करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी अर्जदारास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन प्रकरण निकाली काढणे आवश्यक असते.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व मंत्रालयीन विभागांनी तसेच सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील प्रथम अपिलांवर विहित मुदतीत अर्जदारास

त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळण्याकरिता त्यांची सुनावणी घेऊन आवश्यक ते आदेश पारीत करावेत. जेणेकरुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी अधिनियमातील तरतूदीनुसार राज्यभरात काटेकोरपणे होईल.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर संगणक सांकेतांक क्र. २००७११०६१३२४१९००१ वर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,

टी. एफ. थेक्केकरा
शासनाच्या प्रधान सचिव.

प्रत :-

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- सर्व माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
- प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
- प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
मुख्य सचिवांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
- सर्व विभागीय आयुक्त,
- सर्व जिल्हाधिकारी,
- सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
- सर्व मंडळ / महामंडळे व शासनाचे सर्व सार्वजनिक उपक्रम
- सर्व महानगर पालिका / नगरपालिका / नगर परिषद

निवड नस्ती, सा.प्र.वि., कार्यासन क्र. ६.

- पत्राने